# Modern Indian Languages

## मराठी (०२)

### प्रास्ताविक

वर्तमान युगास अनुरूप असे शिक्षण विद्यार्थ्यांना द्यावे, असा मराठी अभ्यास मंडळाचा विचार आहे. सध्या मराठी भाषेच्या उपयोजनाची विविध क्षेत्रे अस्तित्वात आहेत. उदा. शासकीय, अशासकीय कार्यालयातील कामकाज, उद्योग आणि व्यापार, जाहिरात संस्था, नभोवाणी, दूरचित्रवाणी, चित्रपट, प्रसारमाध्यमे, विज्ञान व तंत्रज्ञान, संगणक या विविध क्षेत्रात मराठी भाषेच्या उपयोजनाचे स्वरूप कसे आहे व कसे असावे, याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना व्हावे, या दृष्टीने नव्या पाठयपुस्तकाची आवश्यकता आहे; असे मराठी अभ्यास मंडळाला वाटते.

मराठी विषयाचे अध्ययन केल्यानंतर विद्यार्थ्यांना उपजीविकेचे साधन मिळविण्याच्या दृष्टीने साह्य व्हावे, हेही उद्दिष्ट या अभ्यासक्रमाच्या मागे आहे. तसेच, या विद्यार्थ्यांचा मराठी साहित्याशी असलेला अनुबंधही कायम राहील, असे वेचे अभ्यासक्रमासाठी निवडले जातील. उदा. विविध प्रकारचे पत्रव्यवहार,मुलाखती, माहितीवर आधारित लेख, वार्तापत्र,वृत्तसंकलन इ.

मराठीच्या विकासासाठी इतर भाषांतून ज्ञान-विज्ञानविषयक ग्रंथ मराठीत आणावेत, अशी शासनाची भूमिका आहे. त्यासाठी हा अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त आहे. यातून विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिभाषेची ओळख होईल. उदा. न्यायालयीन कामकाजाची भाषा, बँक व्यवहाराची भाषा. दैनंदिन व्यवहारात मराठीचा उपयोग वाढावा,अशी शासनाची भूमिका आहे. या अभ्यासक्रमामुळे सर्व व्यवहारांसाठी मराठी भाषेचा वापर करण्याची सवय विद्यार्थ्यांना व पर्यायाने समाजाला लागेल, अशी अभ्यास मंडळाची धारणा आहे.

### उद्दिष्टे

१. भाषेच्या व्याकरणाचे महत्त्व ठसविणे.
२. भाषांतराची कौशल्ये रुजविणे.
३. प्रसारमाध्यमांसाठी लेखन-वाचन करण्याचे कौशल्य प्राप्त करून देणे.
४. परिसरातील व दैनंदिन प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी भाषेचा उपयोग करण्याचा सराव करून घेणे.
५. संगणकावर मराठीचा उपयोग करण्यास प्रोत्साहन देणे.
६. सर्वत्र राजभाषा मराठीचा सन्मान करणारा नागरिक निर्माण करणे.

### इयत्ता अकरावी

१) व्याकरण
२) भाषांतरकौशल्य
३) जाहिरातलेखन
४) सारांशलेखन
५) आकलन
६) इंटरनेटची ओळख (ई -पत्रव्यवहार, ब्लॉग्ज् (अनुदिनी), संकेतस्थळे (वेबसाइटस्), ऑनलाइन वर्तमानपत्रे, युनिकोड(भारतीय भाषा)
७) वृत्तपत्रीय लेखन (बातमी,स्तंभलेखन)
८) परिभाषेची व कोशवाङ्मयाची जुजबी ओळख
९) औपचारिक पत्रव्यवहार
१०) परिसरातील प्रश्नांशी निगडीत संवादकौशल्य (ग्रामपंचायत,जिल्हा परिषद,महानगरपालिका,राज्यशासन)
११) भाषेचे वाङ्.मयीन उपयोजन व प्रातिनिधिक नमुने.

### इयत्ता बारावी

१) व्याकरण
२) भाषांतरकौशल्य
३) वृत्तपत्रीय लेखन (लेख व अग्रलेख)
४) दूरचित्रवाणी व आकाशवाणीसाठी भाषेचे उपयोजन
५) मुलाखत तंत्र (तोंडी व लेखी)
६) संगणक -इंटरनेट, संकेतस्थळे, ओपन ऑफिस, फॉस (Free Open Source Software)
७) भाषेचे वाङ्मयीन उपयोजन व प्रातिनिधिक नमुने.
८) सृजनशील लेखन (Creative writing)

❖❖❖